# उत्सवाच्या दिवशीच्या आरत्या व त्याचा क्रम

## काकड आरती

### १. श्री गणपतीची आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती ॥ध्रु०॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा॥
हिरेजडीत मुकुट शोभतो बरा।
रुणझुणती नूपरे चरणी घागरिया॥ जय० ॥१॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना॥
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना॥ जय ० ॥२॥

## २. तू खायबा साखर लोणी

तू खायबा साखर लोणी। माझीया बाळा गा।।धृ।।
चाकीर भोवरा विटी दांडू। रंगीत गोट्या बेगडा चेंडू।
खेळुनी खेळा गा। तू खायबा ।।१।।

नवं लक्ष गायी गडी। वाट पाहती यमुनेथडी।
करुनी गोळा गा। तू खायबा ।।२।।

बाळ मुकुंद खातो। लोणी कौतुक पाहे नंदराणी।
भरुनी डोळा गा। तू खायबा ।।३।।

भानुदास विनंती करी। प्रसाद द्यावा बा श्रीहरी।
त्रिभुवन पाळा गा। तू खायबा ।।४।।

## ३. साईंची आरती

साई रहम नजर करना
बच्चो का पालन करना॥धृ॥

जाना तुमने जगत पसारा
सब ही झूठ ज़माना, ओ साई साई
सब ही झूठ ज़माना ॥१॥ साई रहम नजर करना ....

मैं अँधा हु बन्दा आप का
मुझको प्रभु दिखलाना, ओ साई साई
मुझको प्रभु दिखलाना ॥२॥ साई रहम नजर करना ....

दासगनु कहे अब क्या बोलू
थक गई मेरी रसना, ओ साई साई
थक गई मेरी रसना ॥३॥ साई रहम नजर करना ....

## ४. देवबाबांची आरती

आरती करीतो देवबाबा आम्हा तू तारी,
आरती करीतो देवबाबा आम्हा तू तारी
पाजुनिया भक्तां देवा भक्तीचे वारी ॥धृ॥ आरती....

कार्य कराया कल्याणाचे होशी अवतारी,
नेणती तुजला म्हणोनी गणती मानव साचारी ॥१॥ आरती...

नाथ पंथ तो धन्य कराया धरिसी करी झोळी
त्यागुनिया वस्त्रा देवा पापांची होळी ॥२॥ आरती...

काम क्रोध हे जाळुनी सखया उद्धरसी सकला
अनंत देव झाला बाबा साई खरा भोळा ॥३॥ आरती ...

आरती करीता ध्यान पाहता काय दिसे डोळा
नारायण तो विकल होऊनि घेई पदी लोळा ॥४॥

आरती करीतो , आरती करीतो, आरती करीतो, देवबाबा आम्हा तू तारी.

## ५. अष्टक

प्रारंभ चैत्रा ऋतू ये वसंता ।
तो नेम मान्या संता महंता ।
चिरंजीव हे पीठ होवोनी आता ।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।१।।

घेऊनि अवतार ह्या मर्त्य लोकां।
देऊनि प्रेमा वारी कुशंका ।
शंका नको ती मजलागी आता ।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।२।।

कल्याण प्रांती वसती करोनी ।
मलंग हाजी गाजी ठरोनी।
समाधिस्थ झालात मच्छिन्द्रनाथा।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।३।।

माहात्म्य मोठे गाजे जयांचे।
नवसास पावे करीता ब्रीदाचे।
रक्षी करी सार्थ काळाही शास्ता ।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।४।।

उदीनाम बाहे घेता जयासी।
विभूत बाधा पळवी भूतासी।
होईल आराम रोग्यासी देता ।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।५।।

पाहोनी दाढी जटा वाढलेली ।
गमेची शंभो त्रयनेत्र भाळी।
मदानंतकारी दासासी त्राता ।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा।।६।।

आद्यंतही सत्य नसे हो जयासी।
आहे हिरा दिव्य स्वयंप्रकाशी।
होवोनी भक्ता सुख शांती दाता।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा ।।७।।

गोरक्ष रक्षा अघाब्धी भक्षा।
देईल मोक्षा धरी शुद्ध पक्षा।
पूर्वी अपेक्षा सर्वज्ञ होता।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा॥८॥

नारायणासी पदी भालदारी।
स्थापोनी रक्षी कर ठेव शिरी।
करवोनी घ्यावी सेवा अनंता।
नमस्कार साष्टांग गोरक्षनाथा॥९॥

निरालस्य सप्रेम सेवा घडावी।
अनंता तुझे पायी भक्ती जडावी।
ध्यावे तुला नित्य प्रेमे ची नाथा।
देई मला हा वर रक्ष आता॥१०॥
॥अलख निरंजन गोरक्षनाथ महाराज कि जय॥

## ६. प्रार्थना (घालीन लोटांगण)

## ७. गजर (ओम साई श्री साई जय जय साई राम)

## ८. ललकारी

॥ अनंतकोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज परब्रह्म सद्गुरु श्री साईनाथ महाराज की जय ॥
॥ अनंतकोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज परब्रह्म सद्गुरु श्री अनंतप्रभु महाराज की जय ॥
॥ किशोरी माते की जय ॥
॥ जय जानकी दुर्गेश्वरी॥